# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक : - २ ऑक्टोबर २०२४

---

जळगाव दि.२ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात महात्मा गांधी जयंती निमित्त गांधी टेकडीवर झालेल्या "भजन प्रभात" या कार्यक्रमात सादर झालेल्या भजनांनी महात्मा गांधी यांना आदरांजली वाहण्यात आली. याच कार्यक्रमात भारताचे माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांना देखील वंदन करण्यात आले.

विद्यापीठाच्या विचारधारा प्रशाळेअंतर्गत महात्मा गांधी अध्ययन व संशोधन केंद्राच्यावतीने सोमवार दि. २ ऑक्टोबर रोजी सकाळी गांधी टेकडीवर संगीत विभागाच्यावतीने भजनांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. रघुपती राघव राजाराम, पायोजी मैने राम रतन धन पायो, वैष्णव जन तो तेने कहीये, गुरु गोविंद दोऊ खडे, इतनी शक्ति हमे दे न दाता, खरा तो एकचि धर्म, हमको मन की शक्ति, तूम बीन मोर, चादरीया झीनी झीनी या भजनांनी महात्मा गांधी यांना आदरांजली वाहण्यात आली. महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. या नंतर विद्यापीठाच्या समाज कार्य विभागाच्या विद्यार्थ्यांनी "स्वच्छता" या विषयावर पथनाट्य सादर केले. यावेळी महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचा सेल्फी पॉईंट उभारण्यात आला तेथे कुलगुरुं समवेत विद्यार्थ्यांनी सेल्फी घेतल्या. या कार्यक्रमास कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी, प्र-कुलगुरु प्रा.एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक प्रा.योगेश पाटील, विचारधारा प्रशाळेचे प्रभारी संचालक प्रा.म.सु. पगारे, महात्मा गांधी अध्ययन व संशोधन केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. उमेश गोगडीया, अधिष्ठाता प्रा. अनिल डोंगरे, प्रा. सचिन नांद्रे, प्रा. के.पी. दांडगे, प्रा.मनसरेआदी उपस्थित होते. संगीत विभागाचे प्रा. पूजा कोळी, प्रा.तेजस मराठे यांच्या मार्गदर्शनाखाली माधुरी महाजन, प्राची सुर्यंवशी, मनोज गुरुव, विजयराज जाधव, सुरेश पाटील, चेतन शिंदे, सुकन्या जाधव, यांनी भजन सादर केले. महेश शेंडे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा.उमेश गोगडीया यांनी मानले. सुरुवातीस कुलगुरु प्रा. व्ही.एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरु प्रा.एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक प्रा.योगेश पाटील, विचारधारा प्रशाळेचे प्रभारी संचालक प्रा.म.सु. पगारे, महात्मा गांधी अध्ययन व संशोधन केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. उमेश गोगडीया, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक प्रा. सचिन नांद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली रासेयोच्या विद्यार्थ्यांनी "स्वच्छता ही सेवा" या पंधरवडया निमित्त रासेयोच्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठ परीसरातील गांधी टेकडी, विविध प्रशाळा, मुला-मुलींचे वसतिगृहे, आदी ठिकाणी स्वच्छता मोहिम राबविली. तसेच रासेयोचे संचालक डॉ.सचिन नांद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी गेल्या पंधरा दिवसात जळगाव शहरातील बस स्टँड, न्यायालय परीसर, रेल्वे स्टेशन व इतर काही भागात स्वच्छता करुन प्लॅस्टीक गोळा करण्यात आले.

बातमी क्र. २

जळगाव दि.२ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात "स्वच्छता ही सेवा" या पंधरवडया निमित्त रासेयोच्या विभागाच्या वतीने विविध कार्यक्रमांअंतर्गत विविम महाविद्यालयाचे प्राचार्य राजेंद्र अहिरे यांचे स्वभाव

स्वच्छता, संस्कार स्वच्छता या विषयावरील व्याख्यान दि.१ ऑक्टोबर रोजी विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र प्रशाळेच्या सभागृहात संपन्न झाले.

युवक व क्रीडा मंत्रालय, नवी दिल्ली, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने हे व्याख्यान आयोजित करण्यात आले. यावेळी अध्यक्षस्थानी रासेयो सल्लागार समितीचे सदस्य डॉ. सुरेश शेलार, रासेयो संचालक डॉ.सचिन नांद्रे उपस्थित होते. प्राचार्य अहिरे यांनी आपल्या व्याख्यानात सांगितले की, मनातील स्वच्छता ही महत्वाची असून मन स्वच्छ असल्यास आपली प्रगती होत राहते. सोशल मिडीयापासून आपण लांब राहीले पाहिजे. ज्या देशाचे नागरिक स्वच्छ असतात त्या देशाची प्रगती होत राहते.आभार धुळे जिल्ह्याचे समन्वयक डॉ. हेमंत पाटील यांनी मानले. या कार्यक्रमाचे आयोजन डॉ.के.पी.दांडगे, डॉ.कविता पाटील व रासेयो विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी केले.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

**आपला विश्वासू**

**जनसंपर्क अधिकारी करीता**